**अर्धन्यायिक प्रकरण- अर्धन्यायिक आदेशांना अंमल देणे तसेच अधिकार अभिलेखात नोंद घेण्यासंदर्भात निर्देश..**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः अन्याप्र - २०२३/प्र.क्र.८०/ज-१ अ**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०७ ऑगस्ट २०२३

<u>वाचा:-</u>

शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. न्यायाप्र-२०२१/प्र.क्र.११६/ज-१अ, दि.१८/०१/२०२२

<u>प्रस्तावना-</u>

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि, महाराष्ट्र जमीन महसूल (अपिले, पुनरिक्षण व पुनर्विलोकन) नियम, १९६७ आणि उक्त संहितेखालील अन्य नियमातील तरतूदी या अन्वये प्राप्त अधिकारात जमीन विषयक अर्धन्यायिक प्रकरणे शासन स्तरावर मा. मंत्री (महसूल) / मा. राज्यमंत्री (महसूल) यांचेकडे वेळोवेळी दाखल करण्यात येतात. मा. मंत्री (महसूल) यांचेसमोरील अशा अपील, पुनरिक्षण अर्जावरील सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आले आहे की, अपर आयुक्त / उपसंचालक, (भूमि अभिलेख) अथवा सक्षम प्राधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशास क्षेत्रीय महसूली अधिकारी हे कित्येक महिने अंमल देत नाहीत किंवा अशा आदेशाची उचित नोंद अधिकार अभिलेखात घेत नाहीत. तद्नंतर असे आदेश शासन स्तरावर आव्हानित केल्यानंतर देखील अशा आदेशास क्षेत्रीय स्तरावर अंमल देण्यात आलेला नसतो तसेच अधिकार अभिलेखात यांची नोंद देखील घेतलेली नसते.

मात्र, शासन स्तरावर दाखल अपिल / पुनरिक्षण अर्जावर सुनावणी आयोजित केल्यानंतर आणि सुनावणीची नोटीस सर्व संबंधितांना पाठविण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविण्यात आल्यानंतर घाईघाईने अपर आयुक्त / उपसंचालक (भूमी अभिलेख) अथवा सक्षम प्राधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशास अंमल देण्याची / अधिकार अभिलेखात नोंदी घेण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर करण्यात येते. ही बाब योग्य व न्यायोचित नाही. यानुषंगाने, सर्व महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना अर्धन्यायिक आदेशाना अंमल देणे तसेच अधिकार अभिलेखात नोंद घेण्यासंदर्भात निर्देश देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:-**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि त्याखालील नियमान्वये प्राप्त अधिकारात क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना अर्धन्यायिक प्रकरणी पारीत आदेशास अंमल देणे व त्याची उचित नोंद अधिकार अभिलेखात घेण्याच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत :-

(१) अपर आयुक्त / उपसंचालक (भूमी अभिलेख) अथवा सक्षम प्राधिकारी यांनी पारीत केलेल्या आदेशास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता अधिनियम, नियमांतील तरतूदी आणि शासनाने

वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार विहित कालावधीत अंमल देवून, त्याची उचित नोंद अधिकार अभिलेखात घेण्याची दक्षता यावी.

(२) तसेच, अशा प्रकरणी अपर आयुक्त, उपसंचालक (भूमि अभिलेख) अथवा सक्षम प्राधिकारी यांनी पारित केलेल्या अर्धन्यायिक आदेशाची अंमलबजावणी केली नसल्यास आणि असे अर्धन्यायिक आदेश संबंधितांनी, शासन स्तरावर मा. मंत्री (महसूल) / मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे स्तरावर संबंधितांनी आव्हानित केल्यामुळे त्याबाबतची सुनावणीची नोटीस क्षेत्रीय स्तरावर प्राप्त झाल्यानंतर अशा सुनावणींचे अंतरिम अथवा अंतिम आदेश पारित होईपर्यंत, अपर आयुक्त / उपसंचालक (भूमि अभिलेख) अथवा सक्षम प्राधिकारी यांनी पारीत केलेल्या आदेशास अंमल देण्यात येवू नये. तसेच त्या आदेशाची अधिकार अभिलेखात नोंद घेवू नये. अशा वेळी शासन स्तरावरुन मा. मंत्री (महसूल) / मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे न्यायालयाकडून पारित होणाऱ्या अर्धन्यायिक आदेशाची प्रतिक्षा क्षेत्रीय महसूली प्राधिकारी यांनी करावी.

(३) सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०८०७१६१८०५७८१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ

Digitally signed by SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=1085617af371f507cb8ee4d914eb645d92480247b61bd58b5c3074ba3a6a62d7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F7145AF5949FB706E2DCB06C2B209B58FFA369F6E085E02041722C90F0528791, cn=SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
Date: 2023.08.07 16:21:36 +05'30'

**( डॉ. सत्यनारायण बजाज )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
२. मा. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
३. सर्व विभागीय आयुक्त,
४. जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख, पुणे
५. सर्व अपर आयुक्त,
६. सर्व उपसंचालक (भूमि अभिलेख)
७. सर्व जिल्हाधिकारी
८. सर्व उप विभागीय अधिकारी
९. सर्व अधिक्षक (भूमि अभिलेख)
१०. सर्व निवासी उपजिल्हाधिकारी
११. सर्व तहसिलदार
१२. सर्व उप अधिक्षक (भूमि अभिलेख)
१३. निवड नस्ती (ज-१ अ)